9

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
बुधवार दिनांक ०३/०७/२००२ रोजी झालेल्या ७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७९ वी बैठक बुधवार दि.०३/०७/२००२ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री.एस्.एस्.झेंडे	मुख्य अधिकारी
३.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
४.	मा.श्री.विश्वास मोकाशी,	सदस्य
५.	मा.श्री.गजेंद्र लष्करी	सदस्य
६.	मा. श्री. रघुनाथ थवई	सदस्य
७.	मा.श्री.रमेश परब	सदस्य
८.	मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई)	सदस्य
९.	मा.श्री.मोहन देसाई	सदस्य
१०.	मा.श्री.बाप्पा सावंत	सदस्य
११.	मा. श्री. संजय शिर्के	सदस्य
१२.	मा. श्री. अबुबकर मूसा बाटलीवाला	सदस्य
१३.	प्रमुख अभियंता, म.न.पा. हयांचे प्रतिनिधी	निमंत्रक
१४.	कर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन सचिवाना बैठकीस सुरवात करण्याच्या सूचना दिल्या. तद्नुसार सचिवांनी बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ७९/१

विषय- **दि.०४.०६.२००२ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ७८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या दि. ०४.०६.२००२ रोजी संपन्न झालेल्या ७८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ५५ वर सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

---ooo---

बाब क्रमांक : ७९.२

विषय- **अनुपालन अहवाल.**
--नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(कालावधी दि. १.६.२००२ ते दि. २८.६.२००२)

सदर अनुपालन अहवाल पृ.क्र.६७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर अनुपालन अहवालाची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, उपकरप्राप्त इमारतींच्या पडझडीमध्ये मृत झालेल्या व्यक्तींच्या वाटपास विमा पॉलीसीनुसार आर्थिक नुकसान भरपाई द्यावयाची असते. काही प्रकरणात सदर आर्थिक नुकसान भरपाई देणे अद्याप प्रलंबित आहे. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, स्टँडिंग कमिटीच्या (ज्यामध्ये १०-१२ आमदार सदस्य असून नागपूरचे आमदार श्री अग्रवाल हे हया स्टँडिंग कमिटीचे सदस्य आहेत) बैठकीमध्ये हा विषय दोन वेळा उपस्थित केला गेलेला आहे. त्यामुळे त्यांच्या पुढील बैठकी अगोदर प्रलंबित प्रकरणांमध्ये आर्थिक नुकसान भरपाई मृत व्यक्तीच्या वारसदारास अदा करणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, प्रलंबित प्रकरणांमध्ये जर आपण स्टँडिंग कमिटीच्या पुढील बैठकी अगोदर मृत व्यक्तींच्या वारसांस आर्थिक नुकसान भरपाई अदा केली नाही तर स्टँडिंग कमिटीच्या बैठकीमध्ये हयाबाबत चर्चा होऊन संबंधित अधिक-यांच्या गोपनीय अहवालात त्याबाबत प्रतिकूल शेरे येण्याची शक्यता आहे.

पूर्तता उपमुख्य अभियंता, उत्तर/दक्षिण, उपमुख्य अधिकारी/ सं.गा.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर व दक्षिण) तसेच उपमुख्य अधिकारी (सं.गा.) तसेच संबंधित कार्यकारी अभियंता हयांना असे आदेश दिले की, मृत व्यक्तींच्या वारसांची माहिती जर उपलब्ध नसेल किंवा वारसा हक्क प्रमाणपत्रे प्राप्त झालेली नसतील तर तशा नोंदी कागदोपत्री ठेऊन हयाबाबतची माहिती प्राप्त करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती दप्तरी ठेवावी. ज्या ८-१० प्रकरणांमध्ये आर्थिक नुकसान भरपाई अदा करणे प्रलंबित आहे त्यांची कारणे दप्तरी नोंद करुन ठेवावीत. ज्या ज्या इमारतींच्या अपघातात व्यक्ती मृत झालेल्या आहेत अशा इमारतींच्या ठिकाणी जाहीर सूचना चिकटवून त्यांच्या कायदेशीर वारसदारांना संबंधित कार्यालयाशी संपर्क साधण्यास आवाहन करण्यात यावे.

मा. सभापती हयांनी हयाबाबत संबंधितांना असे आदेश दिले की, शक्य असल्यास हयाबाबत वर्तमानपत्रातून जाहीर सूचना प्रसिध्द करुन मृत व्यक्तींच्या वारसदारांस संबंधित कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करावे.

मा.सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, ही जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती केव्हापासून प्रलंबित आहेत व त्यासाठी इतका वेळ का लागतो?

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी तदनुसार असे प्रतिपादन केले की, ही प्रलंबित प्रकरणे मागील वर्षाची असून हया प्रकरणांमध्ये मृत व्यक्तींच्या वारसदारांची माहिती उपलब्ध नसल्याने हया प्रकरणांत आर्थिक नुकसान भरपाई अदा करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे हयाबाबत करण्यात

आलेल्या कार्यवाहीच्या नोंदी दफ्तरी ठेऊन संबंधित अपघातग्रस्त इमारतीच्या ठिकाणी व वृत्तपत्राव्दारे जाहीर आवाहन करुन मृत व्यक्तींच्या वारसदारांस संबंधित कार्यालयास संपर्क साधण्यास सांगावे.

-------------0000-------------

सहकारी संस्था कक्ष

बाब क्रमांक : **७९.३**

विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ ब अन्वये भूसंपादनाचे प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास मंजूरी मिळण्याबाबतचे प्रस्ताव.

१. इ.क्र.बेहराम महल, ५४०-५४४, काळबादेवी रोड, मुंबई-०२ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित बेहराम महल सहकारी गृहनिर्माण संस्थे-करिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

२. जोसेफ मॅन्शन, ८, कॉलेज लेन, पोर्तुगीज चर्चसमोर, दादर, मुंबई-२८, येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित जोसेफ मॅन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

३. केशव निवास,२०-अे,नेपीयन्सी रोड, मुंबई-०६येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित केशव निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

४. इ.क्र.३३२५ (२), अरविंद बिल्डिंग, दराबशहा रोड, नेपीयन्सी रोड,मुंबई-३६ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित अरविंद सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

५. इ.क्र.०५, श्रिजी कृपा, असेंबली लेन, डॅडी सेठ अगरी लेन,मुंबइ-०२ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित श्रीजी सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

वरील प्रस्ताव पृ.क्र.६९ ते ९९ वर सादर करण्यात आले आहेत.

कार्यकारी अभियंता (स.सं.कक्ष) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया पाचही प्रस्तावांमध्ये ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांनी एकत्र येऊन त्यांच्या इमारती त्याखालील भूखंडासह म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ ब नुसार संपादित करुन त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस मालकी तत्वावर हस्तांतरित करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे हया प्रस्तावात भूसंपादन कार्यवाही सुरु करण्यासाठी हे प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. इ.क्र.८ कॉलेज लेन, पोर्तूगीज चर्चसमोर, दादर हया प्रस्तावांमध्ये सदर प्रस्तावाचा उद्देश चुकीने पुनर्रचना करणे असा नमूद केला असून तो इमारतीची दुरुस्ती करुन सुस्थितीत ठेवणे असा उद्देश आहे.

मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी अनु.क्र. ३ वरील इ.क्र.१०,ए, नेपियन्सी रोड, केशवन निवास हया प्रस्तावाबाबत असे प्रतिपादन केले की, ही इमारत त्यांनी काल परवाच पाहिली आहे. हया इमारतीतील काही रहिवाशांच्या तक्रारी असून इमारत मालक व दोन तीन रहिवाशांमध्ये आपापसांत भांडणे आहेत. हया इमारतीतील एक रहिवाशी श्री मेहता यांनी सदर प्रस्तावास जरी संमती दिली असली तरी विरोध केला आहे. त्यामुळे हया प्रस्तावाची शहानिशा करुन हया प्रस्तावावर निर्णय घेणे संयुक्तिक होईल असे वाटते.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत अस प्रतिपादन केले की, हया प्रस्तावास ८५.७१ टक्के रहिवाशांनी संमती दिलेली आहे. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये नेहमीच २-३ रहिवाशी इमारत मालकाच्या बाजूचे असतात व इमारत मालक नेहमीच अशा २-३ रहिवाशांना पकडून इतर रहिवाशांबरोबर वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. हया प्रस्तावास नियमांनुसार लागणा-या ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांची संमतीपत्रे असल्याने तसेच हा प्रस्ताव सद्यः प्राथमिक अवस्थेत असल्याने तो शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास काहीच हरकत नाही.

पूर्तता
का.अ./
सहकारकक्ष

हयाबाबत मा. सभापती/दुवपु मंडळ हयांनी असे प्रतिपादन केले की, अशा प्रकरणांची छाननी करताना इमारत मालक संबंधित इमारतीचा पुनर्विकास करीत असताना काही रहिवाशांच्या विरोधामुळे तर असे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत ना हयाचीही छाननी करणे आवश्यक आहे. असे प्रस्ताव सादर करताना रहिवाशांची नेमकी मागणी काय आहे हयाची नोंद कागदपत्रांवर घेऊन नंतरच असे प्रस्ताव सादर करावेत.

मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी तदनंतर असे निदर्शनास आणून दिले की, बोरा बाझार येथील हरिकृपा नावाची सोसायटी असून तिच्या भूसंपादनाबाबत वाद चालू आहे असे समजते. त्यामुळे हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी केली.

तदनुषंगाने का.अ./स.सं.कक्ष हयांनी असा खुलासा केला की, हया प्रस्तावामध्ये विशेष भूसंपादन अधिकारी हयांनी उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता केली आहे. इमारत मालकाने ४५ दिवसांच्या आत त्यांचे आक्षेप/हरकती सादर करणे आवश्यक आहे परंतु दरवेळेस इमारत मालक त्यांच्या हरकती सादर करण्यास वेळ वाढवून मागत आहे व विशेष भूसंपादन अधिकारी त्याला वेळ का वाढवून देत आहेत हयाचा खुलासा त्यांच्याकडून मागवून घ्यावा लागेल.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणात म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ९३ (३) व (४) नुसार विशेष भूसंपादन अधिकारी हयांच्याकडे सुनावणी सुरु असल्याचे दिसून येते. त्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही जलद पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

तदनंतर मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी प्रलंबित ३१ प्रस्तावांच्या सद्यःस्थितीबाबत विचारणा केली असता का.अ./स.सं.कक्ष हयांनी असा खुलासा केला की, हया प्रकरणात विधी विभागाचे मत प्राप्त झाले असून सदर प्रस्ताव श्रीमती पुगांवकर भूसंपादन अधिकारी हयांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहेत.

हयाबाबत मा. सभापती/दुवपु मंडळ हयांनी असे प्रतिपादन केले की, भूसंपादन अधिकारी हया पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती. पुगांवकर हयांच्याकडे आहे त्यामुळे त्यांच्यावर कामाचा बोजा खूप आहे. त्याचप्रमाणे मिळकत व्यवस्थापक श्री जगदाळे हयांचयाकडेही अतिरिक्त कार्यभार असल्याने त्यांच्यावरही कामाचा ताण पडत आहे.

मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, का.अ. हया पदाच्या ब-याच जागा रिक्त आहेत. त्यामुळे रिक्त जागेवर अधिका-यांची नेमणूक करण्याची विनंती सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी केली.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी हयाबाबत कार्यवाही सुरु असल्याचे सांगून लवकरच रिक्त पदे भरली जातील असे सांगितले.

वरील सविस्तर चर्चेअंती विषयांकित ५ प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०२

म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ ब नुसार नियोजित स.गृ.नि. संस्थांसाठी भूसंपादन करावयाचे खालील ५ प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठ सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. इ.क्र.बेहराम महल, ५४०-५४४, काळबादेवी रोड, मुंबई-०२ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित बेहराम महल सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्ताव.

२. जोसेफ मॅन्शन, ८, कॉलेज लेन, पोर्तुगीज चर्चसमोर, दादर, मुंबई-२८, येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित जोसेफ मॅन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्ताव.

३. केशव निवास,२०-अे,नेपीयन्सी रोड, मुंबई-०६येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित केशव निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्ताव.

४. इ.क्र.३३२५ (२), अरविंद बिल्डिंग, दराबशहा रोड, नेपीयन्सी रोड,मुंबई-३६ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित अरविंद सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्ताव.

५. इ.क्र.०५, श्रिजी कृपा, असेंबली लेन, डॅडी सेठ अगरी लेन,मुंबइ-०२ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित श्रीजी सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्ताव.

-------------------oooo---------------

बाब क्रमांक : ७९.४ (१)

विषय- उत्तर परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१०१ ते १०३ वर सादर करण्यात आला असून त्यामध्ये काही चूका झाल्या असल्याने हा प्रस्ताव नव्याने पटलावर ठेवण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, नेहमीप्रमाणे दि. १.११.२००२ ते दि. ३१.१०.२००३ हया कालावधीसाठी उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागांसाठी विभागनिहाय अंदाजपत्रके सादर केली असून त्यानुसार ई. विभागासाठी रु. १८५५५४/- फग/द विभागासाठी रु. ७९५७९१/- व फग/ऊ विभागासाठी रु. ३९७६९०/- अशी एकुण रु. १३,०९,०३५/- रक्कमेची अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागाला टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०३

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागाला टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकांना विभागनिहाय खालीलप्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

विभाग	मंजूर प्रशासकीय रक्कम रुपये
ई	१८५५५४/-
फग/दक्षिण	७२५७९१/-
फग/उत्तर	३९७६९०/-
एकूण :-	१३,०९,०३५/-

-----------------ooo-----------------

बाब क्रमांक : ७९/४ (२)(३)(४)

विषय- सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा वाढीव झालेल्या खर्चास मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव.

१) इ.क्र.११८-१२०, अे.ब्लॉक, शिंदेवाडी, डॉ.बी.ए.रोड,दादर, मुंबई.
२) इ.क्र.४३०, मायकल भवन, एल. जे. रोड, माहीम, मुंबई.
३) इ.क्र.२६३, ई,अमिरानी बिल्डिंग, एम.एस.सी.रोड,माहीम, मुंबई.

वरील प्रस्ताव पृ.क्र.१०५ ते ११५ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, वरील इमारतींचे प्रत्यक्ष दुरुस्ती काम करताना कामात वाढ झाल्याने हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च हा सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा अधिक झाला आहे. सदर वाढीव खर्च हा प्रचलित प्रमाणित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी. मर्यादेतच आहे. हयाशिवाय आयत्या वेळचया विषयामध्ये इ.क्र.७०, भिवंडीवाला बिल्डिंग, डॉ.बी.ए.रोड, दादर हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या वाढीव खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. ठेकेदारांची अंतिम देयके पारीत करण्यासाठी वाढीव खर्चास मंजूरी देण आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की,मागील बैठकीत ठरल्यानुसार त्यांनी अशाच प्रकारच्या प्रकरणातील इ.क्र.१, डॉ.बी.ए.रोड हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या वाढीव खर्चाची पाहणी श्री मेणसे, कार्यकारी अभियंता, फग/ऊत्तर विभाग हयांच्यासमवेत केली. हया पाहणीत दुरुस्ती कामांमध्ये कशाप्रकारे वाढ होते हे प्रत्यक्ष जागेवर तपासले आहे. त्यामुळे असे प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

सविस्तर चर्चेअंती वरील इमारतींच्या दुरुस्तीसाठी सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०४

खालील इमारतींच्या दुरुस्ती कामांमध्ये सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास खालीलप्रमाणे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

अ.क्र.	**कामाचे नाव**	**सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा मंजूर केलेली वाढीव रक्कम रुपये**
१.	इ.क्र.११८-१२०, अे.ब्लॉक, शिंदेवाडी डॉ.बी.ए.रोड,दादर,	११६१६३/-
२.	इ.क्र.४३०, मायकल भवन, एल. जे. रोड, माहीम,	१०३५७४/-
३.	इ.क्र.२६३, ई,अमिरानी बिल्डिंग, एम.एस.सी.रोड,माहीम,	२९४७३/-
४.	इ.क्र.७०, भिवंडीवाला बिल्डिंग, डॉ.बी.ए.रोड, दादर	४३४३६/-

--------------------ooo--------------------

बाब क्रमांक : ७९/४ (५)

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.११७ ते २०३ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील १०, फग/द विभागातील ७, व फग/ऊ विभागातील ९ अशा एकूण २६ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांमध्ये उत्तर परिमंडळातील २ इमारतींच्या दुरुस्ती कामांचे नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. उपमुख्य अभियंता (उ.) हयांनी पृ.क्र.११७ वरील तक्त्यातील शेवटच्या रकान्यामध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम रु. ७५४१२/- ऐवजी ती रु. २०२५९/- अशी असल्याचे सांगितले. तसेच पृ.क्र.१५७ वर सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील रस्त्याचे नाव शंकर नारायण पथ नसून ते शंकर नरम पथ असे आहे व पृ.क्र.१७७ वर सादर करण्यात आलेल्या इ.क्र.६५ गणपती भूवन, बी.जे.देवरुखकर रोड हया इमारतीच्या दुरुस्तीचे काम मंडळामार्फत होणार नसून ते ना.ह.प्र.पत्रांतर्गत होणार असल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती वरीलप्रमाणे दुरुस्ती करुन उत्तर परिमंडळातील एकूण २८ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०५

उत्तर परिमंडळातील एकूण २८ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट **अ** प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

-----------oooo-----------

दक्षिण परिमंडळ

बाब क्रमांक :७९.५(अ)

विषय- इ.क्र.२८८-२८८अे, ताडदेव रोड ऐवजी इ.क्र.२२८-२२८अे, ताडदेव रोड अशी दुरुस्ती प्रशासकीय मान्यतेमध्ये करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. २०५ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. २.२.२००२ रोजी संपन्न झालेल्या ७४ व्या बैठकीत प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय मंजूरीनुसार इ.क्र. इ.क्र.२८८-२८८अे, ताडदेव रोड हा इमारत क्रमांक चुकीचा नमूद करण्यात आल असून सदर इमारत क्र. २२८-२२८अे, ताडदेव रोड असल्याने त्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी असे प्रतिपादन केले की, ही प्रशासकीय बाब असल्याने असे प्रस्ताव मंडळाच्या बैठकीपुढे सादर करण्याची आवश्यकता नाही. अशाप्रकारच्या दुरुस्त्या मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांच्याकडून मान्य करुन घ्याव्यात.

सविस्तर चर्चेअंती इ.क्र.२८८-२८८अे, ताडदेव रोड ऐवजी इ.क्र.२२८-२२८अे, ताडदेव रोड अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०६

मंडळाच्या दि.२.२.२००२ रोजी संपन्न झालेल्या ७४ व्या बैठकीत दुरुस्ती कामाच्या नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेल्या इमारतीचा क्रमांक २८८-२८८अे, ताडदेव रोड ऐवजी इ.क्र.२२८-२२८अे, ताडदेव रोड अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

---------------ooo---------------

बाब क्रमांक : ७९.५ (क)

विषय- **दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

सदर प्रस्ताव पृ.क्र. २०७ ते २९५ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील अे विभागातील ५, बी. विभागातील १०, सी१-२ विभागातील ४, सी३-४ विभागातील ८, डी-१ विभागातील ६ व डी-२ विभागातील ४ अशी एकूण ३७ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण ३७ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०७

दक्षिण परिमंडळातील एकूण ३७ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-ब" नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

------------oooo------------

पुनर्रचना विभाग

बाब क्रमांक : ७९/६

विषय- इ.क्र.३-५, ५ए,बी, एसी, डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव, डी.विभाग, या योजनेंतर्गत ६०८ चौ.मी. क्षेत्रफळ सदनिकेच्या स्वरुपात मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.२९७ व ३०१ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, विषयांकित इमारतीच्या पुनर्रचनेचे काम चालू आहे. जून्या इमारतीत ५१ निवासी + ९ अनिवासी असे ६० भाडेकरु होते. जून्या इमारतीच्या पहिल्या, दुस-या व तिस-या मजल्याच्या काही भागात (एकूण १६ खोल्या) म.न.पा.ची शाळा होती. १९९५ मध्ये ही इमारत पाडल्यानंतर म.न.पा.ची शाळा गिरगावमध्ये स्थलांतरित करण्यात आली.

हया योजनेच्या जून्या मंजूर नकाशांनुसार म.न.पा.च्या शाळेसाठी ४३४.१३ चौ.मी. क्षेत्रफळाची तरतूद करण्यात आली होती. तद्नंतर जून्या इमारतीतील अनिवासी गाळयांच्या क्षेत्रफळामध्ये ब-याच तफावती वा त्रुटी आढळल्याने हया योजनेचे मंजूर नकाशे सुधारित करुन म.न.पा.कडे पुन्हा मंजूरीसाठी सादर केल्यानंतर म.न.पा.च्या शिक्षण अधिका-यांनी शाळेचे जून्या इमारतीतील क्षेत्रफळ १२०९ चौ.मी. असल्याचे कळविले होते. परंतु त्यांच्याकडे १२०९ चौ.मी. क्षेत्रफळाबाबत ठोस पुरावे नव्हते. फक्त इमारत मालकाने सांगितल्यानुसार त्यांनी शाळेचे क्षेत्रफळ १२०९ चौ.मी. असल्याचे कळविले होते. शाळेच्या क्षेत्रफळाबद्दल वाद निर्माण झाल्याने त्याबाबत म.न.पा. आयुक्त यांच्याकडे दि. २.३.२००० रोजी बैठक झाली. हया बैठकीस म.न.पा. व मंडळाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. हया बैठकीमध्ये म.न.पा. आयुक्त हयांनी असे आदेश दिले होते की, म.न.पा. च्या शाळेच्या एकूण १६ खोल्या जून्या इमारतीत असल्याने म.न.पा. अधिनियमानुसार प्रत्येक खोलीचे क्षेत्रफळ ३८.०० चौ.मी. पकडून त्यानुसार एकूण ६०८.०० चौ.मी. क्षेत्रफळ हयाच जागेवरील पुनर्रचित इमारतीमध्ये हस्तांतरित करावे. संपूर्ण् क्षेत्रफळ त्याठिकाणी देणे शक्य नसल्यास उर्वरित क्षेत्रफळ जवळपासच्या परिसरातील पुनर्रचित इमारतीत द्यावे. हया बैठकीमध्ये असेही ठरले होते की, म.न.पा.ला आता शाळेची आवश्यकता नसल्याने हयाठिकाणी पुनर्रचित होणा-या इमारतीत एकूण ४६१.०० चौ.मी.क्षेत्रफळाच्या ४ सदनिका बांधून द्याव्यात व उर्वरित १४७.०० चौ.मी. क्षेत्रफळ डी. विभागातील जवळपासच्या परिसरात निवासी गाळयांच्या स्वरुपात द्यावे.

वरीलप्रमाणे हया योजनेचे नकाशे तयार करुन त्यास म.न.पा.ने दि. २९.५.२००१ रोजी मंजूरी दिली आहे. पुनर्रचनेचे ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

हयाबाबत असा प्रस्ताव सादर केला आहे की, इ.क्र.३-५, ५ए,बी, एसी, डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव हयाठिकाणी पुनर्रचित होणा-या इमारतीत एकूण ४६१.५५ चौ.मी.क्षेत्रफळाच्या ४ सदनिका म.न.पा.ला हस्तांतरित कराव्यात व त्याच परिसरातील इ.क्र. १६ जी ते के, नौशिर भरुचा मार्ग नवी चिखलवाडी या इमारतीच्या पुनर्रचनेचे काम चालू असलेल्या इमारतीत एकूण १४७.००

चौ.मी.क्षेत्रफळाच्या ७ निवासी गाळे म.न.पा.ला हस्तांतरित करावेत. असे एकूण ६०८.०० चौ.मी.क्षेत्रफळ म.न.पा.ला हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव असून तो अतिरिक्त म.न.पा. आयुक्तांकडून प्राप्त झालेला आहे त्यास आपण मान्यता दिलेली आहे. परंतु त्यास मंडळाची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मंडळापुढे मान्यतेसाठी सादर केला आहे.

म.न.पा. आयुक्त हयांच्याकडे झालेल्या बैठकीत म.न.पा. ला हस्तांतरित करावयाच्या क्षेत्रफळापोटी बांधकाम रक्कम म.न.पा. ने द्यावी किंवा कसे हयाबाबत चर्चा झालेली नाही. हे क्षेत्रफळ मंडळाने विनाशुल्क म.न.पा.ला हस्तांतरित करावे असे म.न.पा.ला अभिप्रेत आहे. त्यामुळे आपण कमीतकमी ६०८.०० चौ.मी.क्षेत्रफळाच्या बांधकामाची किंमत म.न.पा.कडून घ्यावी किंवा कसे हयाबाबत आपणांस निर्णय घ्यावा लागेल.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे मत प्रदर्शित केले की, म.न.पा.ला हस्तांतरित करावयाच्या ६०८.०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाची बांधकाम रक्कम म.न.पा.कडून मागावी. हयास मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी सहमती दर्शविली.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, अशाचप्रकारच्या ए.पी.मार्केट पुनर्रचित इमारतीच्या संदर्भात , म.न.पा.ला हस्तांतरित करण्यात आलेल्या गाळयांच्या पोटी म.न.पा.ने आपणांस बांधकाम रक्कम देऊ केलेली नाही त्याचप्रमाणे हयाही प्रकरणात म.न.पा.मंडळाला बांधकाम रक्कम न देण्याचा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, म.न.पा.ला हस्तांतरित करावयाचे क्षेत्रफळ हे आता शाळेसाठी लागणार नसून निवासी गाळयांच्या स्वरुपात हवे असल्याने आपण त्यांच्याकडून बांधकाम रक्कम घ्यावी असेच मत मा.सभापती/दुवपु मंडळ हयांनीही व्यक्त केले.

मुख्य अधिकारी हयांनी तदनंतर ए.पी.मार्केट पुनर्रचित इमारतीबाबत असे प्रतिपादन केले की, हया बराच भाग बांधून रिकामा पडलेला आहे. हयाबाबत पूर्वी दोनदा म.न.पा. त चर्चा झालेली आहे. त्यामुळे हयाबाबत म.न.पा. चे अतिरिक्त आयुक्त श्री राजू हयांच्याबरोबर त्वरित चर्चा करुन हे प्रकरण निकालात काढण्याचे आदेश मुख्य अधिकारी हयांनी उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांना दिले.

तदनंतर मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी अशी विचारणा केली की, मंडळाने पूर्वी म.न.पा.ला अशाप्रकारे बांधकाम क्षेत्रफळ हस्तांतरित केले आहे का? व केले असल्यास अशा हस्तांतरित केलेल्या बांधकाम क्षेत्रफळाच्या देखभालीबाबत आपण म.न.पा.कडून काही शुल्क घेतो का? तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असा खुलासा केला की, आपण आता पुनर्रचित इमारती हया रहिवाशांच्या सहकारी ग.नि. संस्थांना मालकी तत्वावर देत असल्याने अशा प्रकरणात म.न.पा. संबंधित सहकारी ग.नि. संस्थेची भाडेकरु/सदस्य रहाते. त्यामुळे देखभाल व इतर शुल्क म.न.पा. ने संबंधित सहकारी ग.नि. संस्थेस द्यावे लागेल.

प्रमुख्य अभियंता, म.न.पा. हयांच्या प्रतिनिधीनी असे मत प्रदर्शित केले की, जून्या इमारतीत म.न.पा. ची शाळा होती त्यामुळे जून्या इमारतीतील इतर रहिवाशांना ज्याप्रमाणे मंडळ नवीन गाळे

विनाशुल्क बांधून देते त्याचप्रमाणे म.न.पा.ला हस्तांतरित करावयाचे बांधकाम क्षेत्रफळ विनाशुल्क देणे आवश्यक आहे.

मा.सभापती हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, म.न.पा. ला हस्तांतरित करावयाच्या ६०८.०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाची बांधकाम रक्कम म.न.पा.ला कळवून ती मंडळाकडे जमा करण्याची विनंती करावी.

वरील सविस्तर चर्चेअंती म.न.पा.ला ६०८.०० चौ.मी. क्षेत्रफळ निवासी गाळयांच्या स्वरुपात म.न.पा.कडून बांधकाम रक्कम घेऊन हस्तांतरित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०८

इ.क्र.३-५, ५ए,बी, एसी, डॉ. भालेराव मार्ग, गिरगांवमधील म.न.पा. च्या शाळेच्या १६ खोल्यांच्या एकूण ६०८.०० चौ.मी. क्षेत्रफळापोटी एकूण ४६१.५५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या ४ सदनिका इ.क्र.३-५, ५ए,बी, एसी, डॉ. भालेराव मार्ग येथे बांधकाम चालू असलेल्या पुनर्रचित इमारतीत व उर्वरित एकूण १४७ चौ.मी. २२५ चौ.फू. क्षेत्रफळाचे ७ निवासी गाळे इ.क्र.१६ जी ते के हयाठिकाणी बांधकाम चालू असलेल्या पुनर्रचित इमारतीत म.न.पा. कडून बांधकाम रक्कम घेऊन म.न.पा.ला हस्तांतरित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

--------------oooo----------------

मा.अध्यक्षांच्या परवानगीने सादर करण्यात आलेले आयत्यावेळचे विषय

बाब क्रमांक : ७९/७

विषय- **इ.क्र.५-२३, कामाठीपूरा, १५वी गल्ली, भूकर पाहणी क्र.३१५ ते ३२४ भायखळा ई.विभाग हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया योजनेत एकूण १० जून्या इमारतींचा समावेश आहे. जून्या ८२ निवासी + ६ अनिवासी = ८८ गाळयांऐवजी नवीन इमारतीत ८४ निवासी + १३ अनिवासी =९७ गाळे बांधले जाणार आहेत ज्यामुळे मंडळाला एकूण २ निवासी + ७ अनिवासी = ९ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेसाठी एकूण रु. २,४६,२३,२२५/- खर्च अपेक्षित असून त्यास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यासाठी सदर प्रस्ताव सादर केला आहे.

मा.सभापती हयांनी अशी विचारणा केली की, पटेल बिल्डिंगच्या पुनर्रचनेबाबतची सद्य:स्थिती काय आहे. तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी असे प्रतिपादन केले की, गाळयांच्या क्षेत्रफळाच्या संयुक्त पाहणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. क्षेत्रफळातील बदल मंजूर करण्याचे

अधिकार सहमुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांना असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव त्यांच्याकडे मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

तदनंतर का.अ./पु.वि.१ हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, निधी अभावी पुनर्रचना विभागाकडे म.न.पा.ला पैसे भरता येत नाहीत. अशाप्रकारे इमारतींची पुनर्रचना पूर्ण होऊनही म.न.पा.कडे जर पैसे भरले नाहीत तर म.न.पा.कडून भोगवटा प्रमाणपत्र मिळणार नाही. तसेच म.न.पा.कडून पाण्याचे पैसे भरण्याबाबतही पूर्वी पुनरचित झालेल्या इमारतींबाबत नोटीसा पाठविल्या असून जर पैसे भरले नाहीत तर पाण्याची कनेक्शनस् म.न.पा.कडून तोडली जाण्याची शक्यता आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनीही असे निदर्शनास आणून दिले की, एका इमारतीच्या पाण्याच्या कनेक्शनसाठी म.न.पा.कडे रु.४८०००/- जमा करावयाचे आहेत परंतु निधी अभावी हे पैसे भरत येत नाहीत. त्यामुळे जोपर्यंत मंडळ हे पैसे म.न.पा.कडे जमा करणार नाही तोपर्यंत म.न.पा. भोगवटा प्रमाणपत्र देणार नाही.

मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी तदनुषंगाने निधीच्या उपलब्धतेबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे हयाबाबत विचारणा केली.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी त्यानुसार असे प्रतिपादन केले की, मागील वेळेस प्राधिकरणाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर आपण दुरुस्तीसाठी, संक्रमण शिबीरांसाठी व पुनर्रचित इमारतींच्या देखभालीसाठी निधीचे वाटप केले होते. त्यामुळे पुनर्रचनेची कामे सोडून इतर कामांमध्ये आता काही अडचणी नाहीत. प्राधिकरणाने सांगितल्यानुसार आपण पुनर्रचनेच्या कामासाठी मागील वेळी निधी देऊ शकलो नाही. निधीच्या उपलब्धतेबाबत आपण शासन स्तरावर प्रयत्न करीत आहोतच. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनीही उपकराची रक्कम त्वरित मंडळास उपलब्ध करुन देण्याबाबत म.न.पा. आयुक्त हयांना आदेश दिलेले आहेत. त्यादृष्टीने आपण पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी तदनंतर असा प्रस्ताव सादर केला की, ज्याप्रमाणे मागील वेळी प्राधिकरणाने निधी उपलब्ध करुन दिला त्याचप्रमाणे हयावेळीही प्राधिकरणाने मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा ठराव हया बैठकीत संमत करुन प्राधिकरणाला सदर ठराव पाठवून निधी देण्याबाबत विनंती करु.

मा.सभापती हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनी उपकराची रक्कम मंडळाला त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत म.न.पा. आयुक्त हयांना आदेश पूर्वीच दिले असून सदर उपकराची रक्कम प्राप्त करुन घेण्याबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. प्राधिकरणाच्या मागील बैठकीत मा. प्रधान सचिव हयांनीही प्राधिकरणाडे मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती. परंतु प्राधिकरणाने ही विनंती मान्य केली नव्हती. मागील वेळी शासनाने प्राधिकरणास विनंती केल्यानुसार खास बाब म्हणून प्राधिकरणाने निधी उपलब्ध करुन दिला होता. त्यामुळे प्रत्येक वेळेस खास बाब म्हणून प्राधिकरणाकडे निधी मागून हा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघणार नाही. हयासाठी शासन स्तरावरच पाठपुरावा करावा लागणार आहे. येत्या पावसाळी अधिवेशनातही निधीच्या उपलब्धतेबाबत चर्चा होईलच.

वरील सविस्तर चर्चेअंती इ.क्र.५-२३, कामाठीपूरा, १५ वी गल्ली, भायखळा ई.विभाग हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रक्कम रु.२,४६,२३,२२५/- हया खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७९/६०९

इ.क्र.५-२३, कामाठीपूरा, १५ वी गल्ली,भूकर पाहणी क्र.३१५ ते ३२४ भायखळा ई.विभाग हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रक्कम रु.२,४६,२३,२२५/- हया खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

-------------oooo-----------------

ब) विषय- राजीव गांधी निवारा प्रकल्पातील पुनर्रचित इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत एकूण ६५ इमारती पुनर्रचित केल्या आहेत. हया इमारती मालकी तत्वावर दिल्या गेल्याने आपण त्यांची दुरुस्ती करीत नाही. मात्र आपण हया इमारतीतील गाळयांच्या रक्कमेपोटी रु.१४५/- व करांपोटी रु.३५/- असे एकूण रु.१८०/- प्रत्येक गाळेधारकाकडून घेतो. मा.गृहनिर्माण मंत्री हयांनी हया सर्व इमारतींच्या दुरुस्तीबाबत घेतलेल्या बैठकीमध्ये असे आदेश दिले होते की, हया सर्व इमारतींची पाहणी करुन त्यासाठी किती खर्च येईल याची माहिती तयार करा. त्यानुसार हया सर्व इमारतींची पाहणी पूर्ण केली असून हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी अंदाजे रु.४.३० कोटी खर्च अपेक्षित आहे असे त्यांनी कळविले आहे. हा प्रस्ताव मंडळाच्या दि. २१.७.२००१ रोजी संपन्न झालेल्या ६७ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. हया सादर केलेल्या प्रस्तावात थोडा फरक केला आहे. जुन्या प्रस्तावानुसार रु. २.१५ कोटी इतका निधी हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी मंडळाच्या बजेटमधील इतर बाबींमधून वर्ग करुन मंजूर करावा. असे प्रस्तावित होते. मात्र त्यावेळच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या कार्यवृत्तांतानुसार हा निधी शासनाकडून मागावावा असे प्रस्तावित केले होते. व त्याप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठवावा असे ठरले होते. परंतु ठरावामध्ये चूक झाल्याने आपण आज फेर प्रस्ताव सादर केला असून त्यानुसार हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु. २.१५ कोटी इतका निधी शासनाने अनुदान म्हणून द्यावा व हे काम संबंधित स.गृ.नि.संस्थेने त्यांचे मंडळाच्या यादीवरील वास्तुशास्त्रज्ञ व ठेकेदार नेमून त्यांच्याकडून स्वतःच करुन घ्यावे जेणेकरुन त्यांचे स्वतःचे हया कामावर निरिक्षण रहाणार असल्याने दुरुस्ती कामाच्या दर्जाबाबत मंडळास जबाबदार धरले जाणार नाही. तसेच प्रत्यक्ष दुरुस्ती कामे सुरु करण्यापूर्वी संबंधित रहिवाशांनी मंडळाची थकबाकी मंडळाकडे जमा करावी, जेणेकरुन स.गृ.नि.संस्थांचे अभिहस्तांतरण मंडळास त्वरित करता येऊन हया इमारती मालकी तत्वावर त्यांच्याकडे सूपूर्द करता येतील. सुरवातीला असे ठरले होते की, २० टक्के रक्कम मंडळाने व २० टक्के रक्कम रहिवाशांनी जमा करुन दुरुस्ती कामे करावीत. परंतू आताच्या प्रस्तावामध्ये जरी रहिवाशांनी सुरवातीला ५० टक्के रक्कम मंडळाकडे जमा करण्याचे प्रस्तावित केले असले तरी ही ५० टक्के रक्कम एक रकमी भरण्यास भाडेकरु तयार होणार नाहीत. त्यामुळे ५०

टक्क्यांऐवजी २५ टक्के रक्कम एकरकमी भरण्याबाबत रहिवाशांना सांगावे असे वाटते. ही दुरुस्तीची कामे ना.ह.प्र. पत्राच्या धर्तीवर (परताव्यासह) त्यांच्याकडून करुन घ्यावीत जेणेकरुन खर्चाचा हिशोब ठेवणे मंडळास शक्य होईल.

मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, प्रस्तावानुसार थकबाकी वगैरे जमा करुन घेऊन सर्व इमारत मालकी तत्वावर करण्याचा हा चांगला प्रस्ताव आहे. पुढेही दुरुस्तीचा प्रश्न उदभवू नये यादृष्टीने इमारती मालकी तत्वावर करुन खास बाब म्हणून दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव चांगला आहे. दुरुस्तीची कामे ही स.गृ.नि.संस्थामार्फत त्यांच्या वा.शा. व ठेकेदारांकडून मंडळाच्या व स.गृ.नि.संस्थेच्या ५०-५० टक्के निधीतून केल्यानंतर ठेकेदाराच्या देयकाची रक्कम कशी अदा केली जाणार आहे तसेच आपण काम सुरु करण्यापूर्वी काही आगाऊ रक्कम अदा करतो का? अशी विचारणा मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी केली.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्तीचे काम सुरु झाल्यानंतर वा.शा. जसजशी झालेल्या कामाची देयके सादर करतील त्याप्रमाणे ती त्यांना अदा केली जातील. दुरुस्ती काम सुरु करण्यापूर्वी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. इतर देयकांप्रमाणेच याही कामांची देयके अदा केली जातील जेणेकरुन झालेल्या कामाचा हिशोब ठेवणे शक्य होईल.

मा.सभापती हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया इमारतींच्या दुरुस्तीबाबतची पूर्वपिठिका लक्षात घेणे गरजेचे आहे. हया इमारतींत रहाणा-या रहिवाशांची आर्थिक कुवत नसल्याने व सुरुवातीला आपल्या मंडळानेही दुरुस्ती न करण्याचे धोरण स्विकारल्याने हया इमारतींच्या दुरुस्तीबाबत वाद निर्माण झाला होता. हया सर्व इमारतींमध्ये १८० चौ.फू. चटईक्षेत्रफळाच्या सदनिका आहेत. मागे आपण हयाबाबत असा निर्णय घेतला होता की, हया इमारतींची दुरुस्ती आपण करुन देऊन हया इमारती रहिवाशांना मालकी तत्वावर करुन घेण्यास भाग पाडावयाचे. त्यामुळे मागील बैठकीत ठरल्यानुसार हया सर्व इमारतींची पाहणी करुन त्यांच्या दुरुस्ती कामांची अंदाजपत्रके तयार करुन ५० टक्के रक्कम मंडळाने व ५० टक्के रक्कम रहिवाशांनी जमा करुन त्यातून हया इमारतींची दुरुस्ती करावी व तदनंतर हया इमारती मालकी तत्वावर हस्तांतरित कराव्यात. परंतु ही दुरुस्ती कामे रहिवाशांच्या वा.शा. व ठेकेदारामार्फत करताना त्यांच्या इमारतींची जास्तीतजास्त प्रमाणात दुरुस्ती करुन घेण्यासाठी प्रयत्न करतील. त्यामुळे त्यावर मंडळाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. शासनाकडे दुरुस्ती मंडळाला देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासन निधी देईल का? हा प्रश्नच आहे. त्यामुळे हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाने किंवा प्राधिकरणाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी तरतूद प्रस्तावात करणे संयुक्तिक होईल.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया इमारत दुरुस्ती उपकराच्या पैशातून पुनर्रचित केलेल्या नाहीत. हया सर्व इमारती शासनाच्या अनुदानातूनच पुनर्रचित करण्यात आल्या आहेत. हया दुरुस्ती कामांवर मंडळाच्या पॅनेलवरील वास्तुशास्त्रज्ञ नेमणे आवश्यक असून त्यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाची छाननी मंडळाकडून केल्यानंतरच फक्त आवश्यक दुरुस्ती मंडळाची प्रशासकीय मंजूरी घेऊन हाती घेतली जाणार आहे. हया दुरुस्ती कामांची अंदाजपत्रके एक

वर्षापूर्वी तयार केली असल्याने त्यांच्या कामात सद्यःस्थितीला वाढ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे रु. ४.३० कोटीच्या निधीऐवजी रु.५ कोटी निधीही लागू शकतो.

